# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २९ जून, २०२६**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २२२, रूपये:- २५,४८,५५,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (१) | १६२६ | १० | जि.अहिल्यानगर येथील श्रीरामपूर व राहुरी तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यांना रुग्णवाहिकांची आवश्यकता असणे, मात्र पुरेशा प्रमाणात रुग्णवाहिका उपलब्ध नसणे, त्यामुळे नागरिकांना आरोग्यविषयक तातडीच्या उपचारांची आवश्यकता असताना रुग्णवाहिकांच्या अनुपलब्धतेमुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | १५८३ | १० | सांगोला तालुक्यातील घेरडी, महुद हे प्राथमिक आरोग्य केंद्र असून ग्रामीण भागातील हजारो नागरिक या ठिकाणी विविध आजारांवर उपचार घेत असतात परंतु सदर प्राथमिक केंद्रातून रुग्णाला पुढील उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालयात व इतर ठिकाणी घेऊन जाण्यासाठी रुग्णवाहिका नसल्याने रुग्णांना त्याचा त्रास होत आहे. तरी येथील उपकेंद्रांमध्ये रुग्णवाहिका सांगोला तालुक्यातील घेरडी, महुद या महत्वपूर्ण असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णवाहिकांची आवश्यकता असल्याने या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रुग्णवाहिका खरेदी करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३) | १६२१ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये राज्यभरातून मोठ्या संख्येने मनोरुग्ण उपचारासाठी दाखल होतात. या रुग्णांच्या सुरक्षित ने-आण, इतर शासकीय रुग्णालयांमध्ये संदर्भित करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्वरित वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णवाहिका अत्यावश्यक आहे. मात्र, रुग्णालयाकडे उपलब्ध असलेली रुग्णवाहिका जुनी व अपुरी असल्याने रुग्णसेवेत गंभीर अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे रुग्णांच्या हिताचा विचार करून येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयास तातडीने एक नवीन सुसज्ज अतिरिक्त रुग्णवाहिका |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने आवश्यक निधी मंजूर करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (४) | १६४७ | १०० | ईश्वरपूर, जिल्हा सांगली येथील उपजिल्हा रुग्णालयात १० डायलिसिस मशीन मंजूर असणे, परंतु सदर मशीनकरिता आवश्यक तंत्रज्ञांची पदे शासनाने भरली नसल्याने डायलिसिस मशीनचा उपयोग सर्वसामान्य गरजू रूग्णांना होत नसणे व रूग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणे यामुळे डायलिसिस तंत्रज्ञ तात्काळ उपलब्ध करून देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (५) | १६५८ | १० | गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी विधानसभा क्षेत्रातील कोरची व कुरखेडा तालुके हे दुर्गम, आदिवासीबहुल व वनक्षेत्राने व्यापलेले आहेत. या भागातील नागरिकांना तातडीच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णांना जिल्हा रुग्णालय किंवा उपजिल्हा रुग्णालयात हलविण्याची आवश्यकता वारंवार भासते. मात्र, सध्या उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिकांची संख्या अपुरी असल्याने गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त, गर्भवती माता तसेच आपत्कालीन परिस्थितीतील नागरिकांना वेळेत वैद्यकीय सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे आरमोरी विधानसभा क्षेत्रातील कोरची व कुरखेडा येथे स्वतंत्र रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यासाठी नवीन रुग्णवाहिका खरेदी करण्यास मंजुरी देऊन आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (६) | १५८९ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये (PHC) ग्रामीण भागातील गरोदर महिलांच्या प्रसूती सेवांबाबत गंभीर अनियमितता व ढिलाई होत असल्याचे स्थानिक स्तरावर झालेल्या अधिकृत आमसभेत उघड झाल्याचे निदर्शनास आलेले असणे, सदर आमसभेत स्थानिक सरपंचांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रसूतीसाठी आलेल्या महिलांना वेळेवर सेवा न मिळणे, रुग्णवाहिका (Ambulance) उपलब्ध नसणे तसेच डॉक्टर व आरोग्य सेविका अनुपस्थित राहणे याबाबत गंभीर आरोप केलेले असणे, या पार्श्वभूमीवर माननीय पालकमंत्र्यांनी उमरेड तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे प्रशासकीय व वैद्यकीय ऑडिट करण्याचे निर्देश दिले असल्याचे सांगितले जात असणे, तरी देखील सदर ऑडिट प्रक्रिया अद्याप पूर्णपणे सुरू झालेली नसणे किंवा त्याची स्पष्ट प्रगती दिसून न येणे, प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील या त्रुटींमुळे ग्रामीण भागातील मातृ आरोग्य सेवांवर प्रतिकूल परिणाम होत असून नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | १६२४ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड, कुही व भिवापूर या ग्रामीण रुग्णालयांमध्ये, भिवापूर येथे मोठ्या प्रमाणावर मंजूर पदे रिक्त असल्यामुळे आरोग्यसेवा अत्यंत अपुरी व विस्कळीत झालेली असणे, उमरेड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक (१ पैकी १), वैद्यकीय अधिकारी (३ पैकी १), औषध निर्माता अधिकारी (२ पैकी 1), कनिष्ठ लिपीक (२ पैकी १), कक्षसेवक (४ पैकी १) अशी महत्त्वाची पदे रिक्त असल्यामुळे एकूण १२ पैकी ५ पदे रिक्त असणे, कुही ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक (१ पैकी १), सहाय्यक अधिक्षक (१ पैकी १) तसेच औषध निर्माता अधिकारी (२ पैकी १) अशी एकूण ४ पैकी ३ पदे रिक्त असणे, भिवापूर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी (३ पैकी २), कनिष्ठ लिपीक (२ पैकी १), औषध निर्माता अधिकारी (२ पैकी १), दंत सहाय्यक (१ पैकी १), कक्षसेवक (४ पैकी १) अशी एकूण १२ पैकी ६ पदे रिक्त असणे, तसेच भिवापूर येथे बधिरीकरण शास्त्रज्ञ (२ पैकी १) हे महत्त्वाचे पद रिक्त असणे, या मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांमुळे रुग्णांना वेळेवर उपचार न मिळणे, आपत्कालीन सेवांमध्ये अडथळे निर्माण होणे तसेच ग्रामीण व गरीब रुग्णांचे हाल होणे, आरोग्य यंत्रणा अपुरी असल्यामुळे गंभीर रुग्णांना जिल्हा रुग्णालयाकडे हलवावे लागणे व त्यामुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवितास धोका निर्माण होणे,संबंधित विभागाकडून वारंवार मागणी करूनही रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत प्रभावी कार्यवाही करण्यात आलेली नसणे, त्यामुळे शासनाला माझी विनंती आहे की त्यांनी उमरेड मतदार संघातील या तिन्ही तालुक्यातील कुही भिवापूर आणि उमरेड येथील आरोग्य विभागातील विविध रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २२३, रूपये:- ४०,००,००,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (८) | १६४१ | १०० | यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यातील बोटाणी हे गाव आदिवासी बहुल असून येथील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा मिळविण्यासाठी दूर अंतरावरील आरोग्य केंद्रांवर अवलंबून राहावे लागते. विशेषतः गर्भवती माता, बालके, ज्येष्ठ नागरिक आणि आपत्कालीन रुग्णांना यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना दर्जेदार व तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मारेगाव तालुक्यातील बोटाणी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | १६४२ | १०० | यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यातील शिंदोला हे सुमारे ३,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले तसेच परिसरातील अनेक गावांसाठी महत्त्वाचे बाजारपेठेचे केंद्र आहे. या भागातील नागरिकांना गंभीर आजार, अपघात, प्रसूती व इतर आपत्कालीन वैद्यकीय सेवांसाठी दूरवर जावे लागत असल्याने रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. शिंदोला येथे ग्रामीण रुग्णालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने स्थानिक तसेच परिसरातील हजारो नागरिकांच्या आरोग्य सेवांवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे शिंदोला येथे सर्व आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय सुविधांसह ग्रामीण रुग्णालय स्थापन करणे अत्यंत आवश्यक असून शिंदोला येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१०) | १५९४ | १० | सांगोला तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे यांच्या बळकटीकरणाकरीता डिजिटल एक्सरे मशीन, पोरटेबल अल्ट्रा साऊंड सुविधा, रक्त तपासणीसाठी आधुनिक प्रयोगशाळा, नेत्र तपासणी उपकरणे तसेच सौरऊर्जा प्रणाली तसेच मधुमेह, रक्तदाब, कर्करोग यां आजारांचे स्क्रीनिंग साठी आधुनिक उपकरणे अत्यंत आवश्यक आहेत. तरी सांगोला तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रामध्ये सदरची उपकरणे उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (११) | १६४६ | १०० | माणगाव, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात दर्जावाढ करण्याची मागणी नागरिक तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडून होत असणे.माणगाव खोऱ्यात २६ ते २७ गाव असून सदरचा भाग ग्रामीण आणि दुर्गम असल्याने लोकांची आरोग्याच्या दृष्टीने मोठी गैरसोय होत आहे.माणगाव येथे ग्रामीण रुग्णालय झाल्यास ५० ते ६० हजार लोकसंख्येच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे .या भागातील जनतेच्या आरोग्याच्या हितासाठी माणगाव येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (१२) | १६५९ | १० | आरमोरी विधानसभा क्षेत्रातील आरमोरी व कुरखेडा येथील उपजिल्हा रुग्णालय येथे सीटी स्कॅन (CT Scan) व एमआरआय (MRI) यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१३) | १५६२ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथील ग्रामीण रुग्णालयात सध्या गंभीर स्वरूपाची अस्वच्छता व प्रशासकीय अव्यवस्था निर्माण झाली असल्याचे निदर्शनास येणे, रुग्णालय परिसरात झाडी-झुडपे वाढलेली असून ठिकठिकाणी कचरा साचलेला असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असणे, रुग्णालयातील स्वच्छतेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असून केवळ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | एक स्थायी व काही कंत्राटी कर्मचाऱ्यांवर संपूर्ण स्वच्छता व्यवस्था अवलंबून असणे, त्यामुळे ओपीडी वेळेत सुरू होण्यापूर्वी स्वच्छता पूर्ण न होऊन सकाळी दहा वाजेपर्यंत काम सुरू राहत असल्याने रुग्णसेवा उशिराने सुरू होत असल्याचे दिसून येणे, वैद्यकीय अधीक्षकांचे निवासस्थान सध्या कचराकुंडीसारख्या अवस्थेत असून कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या निवास व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले असल्याचे निदर्शनास येणे, डॉक्टरांची वेळेवर उपस्थिती नसणे तसेच ओपीडी वेळेचे पालन न होणे यामुळे रुग्णांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागत असणे, रुग्णालयात स्थायी वैद्यकीय अधीक्षकाची नियुक्ती नसल्याने व्यवस्थापनात समन्वयाचा अभाव निर्माण झाला असणे, या सर्व कारणांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व असंतोष निर्माण झाला असणे, रुग्णालयातील स्वच्छता व्यवस्था बळकट करणे, अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करणे, डॉक्टरांची वेळेवर उपस्थिती सुनिश्चित करणे, पाणीपुरवठा व वीज व्यवस्था सुरळीत करणे तसेच रुग्णालयाच्या संपूर्ण व्यवस्थेचे पुनरावलोकन करून तातडीने सुधारणा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | १५६४ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथील ग्रामीण रुग्णालयात गंभीर प्रशासकीय व आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी दिसून येणे, दि. १० मे रोजी एका ७० वर्षीय रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन प्रक्रियेपूर्वी सुमारे १० तास शव रुग्णालयाच्या वार्डमध्येच ठेवण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, शवगृह (मॉर्च्युरी) उपलब्ध नसल्याने किंवा त्यातील यंत्रणा बंद पडल्याने रुग्णालय प्रशासनाला शव स्वतंत्र सुरक्षित ठिकाणी ठेवता न येणे, परिणामी त्याच वार्डमध्ये इतर रुग्णांवर उपचार सुरू असताना शव ठेवण्यात आल्याने रुग्ण व नातेवाईकांमध्ये अस्वस्थता व भीतीचे वातावरण निर्माण होणे, रुग्णालयातील ट्रॉमा सेंटरमधील शवपेटिका व संबंधित उपकरणे तांत्रिक बिघाडामुळे बंद असल्याचे समोर येणे, तसेच रुग्णालय परिसरात स्वच्छतेचा अभाव, शौचालयांची दुरवस्था, भिंतींवर अस्वच्छता व आवारा कुत्र्यांचा वावर असल्याचे निदर्शनास येणे, रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये विलंब व कर्मचारी कमतरता असल्याचे कारण प्रशासनाकडून सांगितले जात असणे, या सर्व प्रकारांमुळे ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे रुग्णालयात शवगृहाची तत्काळ दुरुस्ती/नवीन व्यवस्था, स्वच्छता सुधारणा, अतिरिक्त कर्मचारी नियुक्ती, उपकरणांची देखभाल तसेच रुग्णांच्या सन्मान व सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (१५) | १६५० | १०० | अंजनगाव सुर्जी तालुक्याची लोकसंख्या सुमारे १.५० लाखांपेक्षा अधिक असून शहरासोबत मोठा ग्रामीण भाग या रुग्णालयाशी जोडलेला आहे. तसेच सातपुडा पर्वतरांगेच्या पायथ्याशी असलेली अनेक आदिवासी गावे देखील अंजनगाव सुर्जी शहराशी निगडित आहेत. त्यामुळे या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यसेवेची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जबाबदारी अंजनगाव सुर्जी येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयावर मोठ्या प्रमाणात आहे.सध्या या ग्रामीण रुग्णालयात नेत्र शस्त्रक्रिया विभाग उपलब्ध नसल्यामुळे डोळयांच्या विविध शस्त्रक्रियांसाठी नागरिकांना खाजगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. परंतु खाजगी रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रियेसाठी मोठा खर्च येत असल्याने तालुक्यातील गरीब, शेतकरी, मजूर व आदिवासी बांधवांना तो परवडत नाही. तसेच शासकीय रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना परतवाडा, अकोट, अमरावती आदी बाहेरच्या शहरांमध्ये जावे लागते. यामुळे वेळ, पैसा व श्रम यांचा अतिरिक्त भार सर्वसामान्य जनतेवर पडत आहे. त्यामुळे अंजनगाव सुर्जी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये नेत्र शस्त्रक्रिया विभाग तातडीने सुरू करण्यात यावा, जेणेकरून तालुक्यातील गोरगरीब जनतेला त्यांच्या परिसरातच दर्जेदार व परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध होईल.तसेच सदर ग्रामीण रुग्णालयामध्ये डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ व इतर कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा असल्याने रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होत आहे. म्हणून रुग्णालयातील आवश्यक मनुष्यबळ वाढवून रिक्त पदे तातडीने भरावीत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २२४, रूपये:- १,५८,४०,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१६) | १६२२ | १० | पुणे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून त्याचबरोबर कर्करोगाच्या रुग्णांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे. कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यास उपचार यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते. मात्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व सर्वसामान्य नागरिकांना महागड्या तपासण्या व खाजगी रुग्णालयांतील उपचारांचा खर्च परवडत नसल्याने अनेक रुग्ण वेळेवर निदान व उपचारांपासून वंचित राहतात. या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांची नियमित कर्करोग तपासणी व लवकर निदान करण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज मोबाईल कर्करोग निदान वाहन (Mobile Cancer Screening Unit) कार्यान्वित करणे अत्यंत आवश्यक आहे. या वाहनाद्वारे स्तन, मुख, गर्भाशयाच्या मुखाचा तसेच इतर सामान्य कर्करोगांचे प्राथमिक निदान नागरिकांच्या परिसरातच करता येईल, ज्यामुळे कर्करोगाचे लवकर निदान होऊन मृत्यूदर कमी करण्यास मदत होईल. त्यामुळे पुणे शहरासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून मोबाईल कर्करोग निदान वाहन तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २३३, रूपये:- ५,२१,८५,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१७) | १६०० | १० | सांगोला तालुक्यातील महूद, घेरडी व कोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना शववाहिनी उपलब्ध करून देण्याबाबत सांगोला तालुक्यातील महूद, घेरडी व कोळा ही लोकसंख्येने मोठी गावे असून या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरविल्या जातात. तथापि, संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये शववाहिनीची सुविधा उपलब्ध नसल्याने मृत व्यक्तींचे पार्थिव त्यांच्या घरी अथवा पुढील वैद्यकीय तपासणीसाठी नेण्याकरिता नागरिकांना खासगी वाहनांचा वापर करावा लागतो. त्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तरी राज्य शासनाने महूद, घेरडी व कोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी स्वतंत्र शववाहिनी उपलब्ध करून देणे, त्यासाठी आवश्यक निधी मंजूर करणे, वाहनचालक व इंधन खर्चासाठी तरतूद करणे तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना सन्मानपूर्वक व तातडीची शववाहतूक सेवा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, या उद्देशाने संबंधित मागणीतील खर्च कमी करण्याबाबत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २३४, रूपये:- ५७,४५,०८,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१८) | १५८२ | १० | म्हसळा (जि. रायगड) येथील रुग्णालयात मंजूर पदांच्या तुलनेत कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या अत्यल्प असून अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा वेळेवर मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, सदर रुग्णालयात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर रुग्णांची नोंद होत असून बाह्यरुग्ण (OPD), आंतररुग्ण (IPD), प्रसूती, शस्त्रक्रिया तसेच, आपत्कालीन सेवांचा मोठा ताण असूनही वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने उक्त परिसरातील गंभीर रुग्णांना अलिबाग किंवा इतर मोठ्या रुग्णालयात उपचारार्थ घेवून जाताना त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास येणे, तद्नुषंगाने रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक (वर्ग-1) आणि दोन कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून मागणी होत असूनही त्याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, तद्नुषंगाने म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरुन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे, मनुष्यबळ व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२११, कुटुंबकल्याण**<br>**बाब क्रमांक: २४४, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१९) | १५८१ | १० | मनोर (तालुका/जिल्हा-पालघर) येथील रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, विशेषत: स्त्रीरोग तज्ज्ञ यांची पदे दिर्घकाळापासून रिक्त असून त्यामुळे महिला रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा वेळेवर मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर रुग्णालयात गर्भवती महिलांना प्रसूतीसाठी तसेच, स्त्रीरोग संबंधीत उपचारासाठी योग्य सुविधा व तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे त्यांना इतर ठिकाणी जावे लागत असून त्यामुळे त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, गरीब महिलांना आर्थिक अडचणींमुळे खाजगी रुग्णालयात उपचार घेणे शक्य नसल्याने त्यांच्यावर आरोग्याच्या दृष्टीने गंभीर परिणाम होत असल्याची बाब निदर्शनास येणे, याबाबत स्थानिक नागरीकांनी तक्रार करुनही आरोग्य विभागाने कोणतीही कार्यवाही न करणे, सदर रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञ व इतर आवश्यक वैद्यकीय अधिकारी तातडीने नियुक्त करण्याबाबत व आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे व पायाभूत सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीस सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: २४६, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. रामदास मसराम** |
| (२०) | १६४३ | १० | रुग्णालयांमध्ये कापड खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक साहित्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. आरमोरी, कुरखेडा व वडसा येथील उपजिल्हा रुग्णालये/उप रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक असलेले बेडशीट, उशी कव्हर, पडदे, ऑपरेशन थिएटरसाठी लागणारे कापडी साहित्य तसेच इतर आवश्यक कापडाची कमतरता जाणवत आहे. सदर रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारासाठी येत असल्याने स्वच्छता व संसर्ग नियंत्रणाच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात कापडी साहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे. सध्या उपलब्ध साहित्य जुने व अपुरे असल्याने रुग्णसेवेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरमोरी, कुरखेडा व वडसा येथील उपजिल्हा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रुग्णालये/उप रुग्णालयांमध्ये आवश्यक कापड खरेदी करण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करून तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | १६४९ | १० | उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा व कोरची येथे वैद्यकीय अधिकारी यांच्यासाठी वाहन व्यवस्था व नवीन वाहन खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत. महाराष्ट्र राज्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुरखेडा व कोरची तालुक्यांमध्ये आरोग्य सेवा संदर्भातील पुरवठा करताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. उपजिल्हा रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर तसेच आरोग्य कर्मचारी यांना दुर्गम गावांमध्ये भेटी देणे, आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ पोहोचणे, साथीच्या रोगांचे नियंत्रण करणे व विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी वाहनांची अत्यंत आवश्यकता आहे. सद्यस्थितीत उपलब्ध वाहनांची संख्या अपुरी असून काही ठिकाणी वाहन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य सेवेवर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | १६५१ | १० | कुरखेडा तालुका हा दुर्गम व आदिवासी बहुल भाग असून येथील रुग्णांना विविध तपासण्यांसाठी जिल्हा मुख्यालय अथवा इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे रुग्णांचा वेळ, पैसा व श्रम खर्च होतो तसेच उपचारास विलंब होण्याची शक्यता निर्माण होते. कुरखेडा येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा (Laboratory) उपलब्ध नसल्याने रक्त, मूत्र, जैवरासायनिक व इतर आवश्यक तपासण्या स्थानिक स्तरावर करता येत नाहीत. रुग्णांना दर्जेदार व तत्काळ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा येथे सुसज्ज उप जिल्हा प्रयोगशाळा उभारणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा येथे प्रयोगशाळा इमारत तयार करणे तसेच आवश्यक यंत्रसामग्री व उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | १६५३ | १० | कोरची व कुरखेडा तालुके हे जिल्ह्यातील अतिदुर्गम, वनक्षेत्र व दुर्गम भौगोलिक परिस्थिती असलेले भाग आहेत. या भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत वेळेत वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यात अनेक अडचणी येतात. गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त तसेच माता-बालकांना तातडीने आरोग्य संस्थेत दाखल करण्यासाठी सक्षम रुग्णवाहिका व्यवस्था अत्यावश्यक आहे. सद्यस्थितीत उपलब्ध रुग्णवाहिकांची संख्या अपुरी असून दुर्गम गावांपर्यंत पोहोचण्यास विलंब होत आहे. त्यामुळे आपत्कालीन वैद्यकीय सेवांची परिणामकारकता वाढविण्यासाठी कोरची व कुरखेडा तालुक्यात रुग्णवाहिकांचे शोध, नियंत्रण व उपलब्धता सुलभ करणारी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | यंत्रणा उभारणे तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाने बाब क्र.२४६ अंतर्गत कोरची व कुरखेडा या अतिदुर्गम भागांमध्ये आपत्कालीन वैद्यकीय सुविधा बळकट करण्यासाठी रुग्णवाहिका शोध व समन्वय व्यवस्था विकसित करणे, नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ जून, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई